Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidiciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# तेलंगणातील भूदान चळवळ – विनोबा भावेंची आर्थिक समतेसाठी क्रांतिकारी सुरवात

*गोविंद मा. तिरमनवार*

सहाय्यक प्राध्यापक इतिहास स्व. दत्तात्रय पुसदकर कला महा.
नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती.

***सारांश :***

आधुनिक भारताच्या इतिहासात विनोबा भावे यांचे नाव अत्यंत आदराने घेतल्या जाते. एकोणविसाव्या, विसाव्या शतकात भारतामध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. स्वातंत्र्य चळवळ सुरू असतांना ज्यांनी महाराष्ट्रीय समाजाला राजकीय आणि सामाजिक नेतृत्वाबरोबरच अध्यात्मिक नेतृत्वही पुरविले त्यात विनोबा भावे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. विनोबांनी, महात्मा गांधी यांच्या शिकवणीनुसार आचरण करून समाजाला एक आदर्श घालून दिला सोबतच गांधी मार्गावरून समाजाने वाटचाल करावी यासाठी अथक प्रयत्न केले. विनोबा भावेंनी तेलंगणा प्रांतात सुरू केलेली भूदान चळवळ संपूर्ण देशात नव्हे तर जगामध्ये अतुलनीय ठरली. जे लोक भूमीहीन आहेत, गरीब आहेत, अशांना करूणेच्या मार्गाने भूमीपतींकडून जमीन मिळवून देऊन आर्थिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने विनोबांनी केलेले कार्य अत्यंत महत्वाचे होते. विनोबांची तेलंगणातील भूदान चळवळ आर्थिक समतेसाठीची, क्रांतिकारी सुरूवात होती.

***प्रस्तावना :***

आधुनिक महाराष्ट्र आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये भावे घराण्याचा विशेषत विनोबांचा वाटा आहे. विनोबा एका इतिहास संपन्न अशा घराण्यातून पुढे आलेले प्रसिध्द पुरूष होत. भावे घराण्यातील विनोबा, बाळकोबा आणि शिवाजीराव या तीनही बंधूनी  स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला वाटा उचलला. आपले सारे जीवनच राष्ट्रकार्यासाठी समर्पित करून टाकले. एकाच घराण्यातील तीन बंधू महात्मा गांधीजीच्या चळवळीत प्रवेश करतात आणि त्या चळवळीमध्ये स्वतचा ठसा उमटवतात हे दुर्मीळ उदाहरण[1] आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेली भूदान चळवळ आर्थिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने उचलेले क्रांतिकारी पाऊल होते. सर्वोदय विचार सरणीतून भूदान हा भूमी प्रश्नावरील उत्तम उपाय म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी भूदान कार्य हाती घेतले. त्यांची अशी धारणा होती की, भूमिपतींनी त्यांच्या जमिनीचा काही भाग भूमिहीनांच्या पुनर्वसनासाठी दिल्यास भूमिपती व भूमिहीन यांच्यातील संघर्ष टाळता येईल. महात्मा गांधीजींच्या जीवन व तत्वज्ञानावर सर्वोदय तत्वप्रणाली आधारित आहे. शोषणविरहित समाज व सर्वांच्या अभ्युदयाची काळजी घेतली जाईल असा समाज म्हणजे सर्वोदय समाज असलेली सर्वोदय कार्यकर्त्यांची धारणा आहे. समाजात प्रचलित असलेली आर्थिक विषमता ही प्रामुख्याने हिंसेला कारणीभूत आहे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते मूलत शोषणावर आधारलेली विषमता कधीही हिंसा अथवा प्रतिहिंसेने नष्ट होऊ शकणार नाही. सर्वोदयवादी विचारवंत प्रतिपादन करतात की, योग्य शिक्षणाद्वारे लोकांचे मतपरिवर्तन करत हिंसा व आर्थिक विषमता नाहीसी करता येईल. म्हणून सर्वोदयवाद्यांनी मतपरिवर्तनाद्वारे समाज परिवर्तनाचा प्रयोग करण्यासाठी सर्वोदय कार्यक्रम हाती घेतला[3]. याच विचारसरणीतून विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली.

सर्वोदय समाजाचे तिसरे अधिवेशन हैद्राबादपासून चार मैलावर शिवरामपल्ली येथे एप्रिल १९५१ मध्ये घेण्याचे ठरले. परिषदेला जाण्यासाठी विनोबा पवनार आश्रमातून ८ मार्च रोजीच पायी निघाले. ३१५ मैलाचा प्रवास करून सर्वोदय संमेलनाच्या एक दिवस आधी म्हणजे ७ एप्रिल रोजी विनोबा शिवरामपल्ली येथे पोहचले. या अधिवेशनाला विनोबांच्या जीवनात फार महत्वाचे स्थान आहे. कारण या अधिवेशनानंतरच्या घटनामुळे भूदान यज्ञाची सुरवात केली.[4]भूतपूर्व हैद्राबाद संस्थानातील तेलंगणा प्रदेशातील गरीब भूमीहीनांनी साम्यवादी तत्वप्रणालींच्या अंमलाखाली येऊन ठिकठिकाणी जमीनदारांविरूध्द उघड व हिंसात्मक उठाव केला होता. त्यामुळे शिवरामपल्ली येथील सर्वोदय समाजाचे अधिवेशन संपल्यानंतर तेलंगणातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी विनोबांनी १५ एप्रिल १९५१ रोजी पदयात्रा सुरू केली. तेलंगणात विनोबांना जाळपोळ, लुटालूट, कत्तलींचे दर्शन झाले. विनोबा तुरूंगामध्ये असलेल्या साम्यवादी पुढाऱ्यांशी गावतील श्रीमंताशी व सामान्य जनतेशी बोलले. १८ एप्रिल १९५१ रोजी विनोबा पोचमपल्ली गावात पोहचले. हे गाव कम्युनिष्ट चळवळीच केंद्र समजले जाई. या भागाची खरी समस्या विनोबांना आधीच लक्षात आली. भूमी समस्या हिच एकमेव समस्या असून त्यावर तोडगा शोधणे आवश्यक होते. गावची लोकसंख्या तीन हजार तर त्यातील अडीच हजार लोक भूमीहीन. विनोबा त्यांच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे गावातील हरिजन वस्तीत सर्वप्रथम[5] गेले  लोक जमा झाले त्यांनी आपली कर्मकहाणी विनोबांना ऐकविली आणि प्रार्थना केली की, ‘‘जर आम्हाला थोडीशी जमीन मिळाली तर आमचा उदरनिर्वाह चालू शकेल’’ हे ऐकूण विनोबा अस्वस्थ झाले. त्यांच्या दुखाचे निवारण कसे होईल?शासनाकडून यांना जमीन मिळवून द्यावी असाही विचार क्षणभर विनोबांच्या मनात आला. पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी त्यांच्या समोर असणाऱ्या श्रोत्यांनाच आवाहन केले की या श्रोत्यात कोण असा व्यक्ती आहे. जो या दलितांची गरज,  पूर्ण करू शकेल? विनोबांनी असा प्रश्न करतातच, रामचंद्र रेड्डी नावाचा तरूण हात जोडून विनोबांना म्हणाला, ‘‘मी शंभर एकर जमीन देण्यास तयार आहे.’’ सायंकाळच्या सभेत विनोबांनी सद्गतीत होत पहिल्या भूदानाची घोषणा [6]केली.  हाच भूदान यज्ञाचा प्रारंभ होय. येथे

लाभलेल्या दानाची ज्योत विनोबांनी चालू ठेवली.

पोचमपल्ली गावात घडलेली ही घटना आर्थिक विषमता नष्ट करून आर्थिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने घडलेली महत्वाची घटना होती. आजवरचा येथील संघर्ष जमिनीसाठीच चाललेला होता. ज्यांच्याजवळ जमीन नाही अंशासाठी कोणीतरी जमीन द्यायला तयार होतो हे दृश्य आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच दिसत होते. पोचमपल्ली गावात एक नवा इतिहास घडला होता. शंभर एकर जमीन दान देण्याचा आणि घेण्याचा प्रसंग खरे म्हणजे एक लक्षणीय क्षण प्रथमच येत होता. विनोबांनी रामचंद्र रेड्डींना आणि इतरांना ज्यांना जमीन नाही त्यांना ती देण्याची आवश्यकता तर्कदृष्टया पटवून दिली. त्यामुळे भूदान यज्ञाच्या जन्म झाला. पोचमपल्ली गावानंतर दुसऱ्या दिवशी विनोबा भावे पुढील गावी गेले आणि तेथे त्यांनी रामचंद्र रेड्डींच्या दानाविषयी प्रवचनात उल्लेख केला त्या गावीही त्यांनी जमीन मागितली आणि लोकांनी त्यांना ती दिली.[7]

कायदा आणि कत्तलीने जो प्रश्न सुटत नव्हता तो प्रश्न विनोबांनी करूणेच्या माध्यमातून सोडविला. भूमिसमस्या सोडविण्याच्या संदर्भात भाष्य करतांना विनोबा भावे म्हणाले की, श्भूमी समस्या सोडविण्याचे तीन मार्ग आहेत. कत्तल, कायदा आणि करूणा. कत्तलीच्या मार्गाने हा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न रशिया व चीनने केले. पण हिंसेतून प्रतिहिंसेचे दृष्टचक्र सुरू होते. कायद्याच्या मार्गाने भूमिवाटप कराल, तर त्यातून असंख्य प्रश्न नि भांडणे निर्माण होतात. करूणेच्या मार्गाने जमिनीबरोबर प्रेमही वाटले जाते. हृदय जुळतात. करूणेचा मार्ग हा भारतीय संस्कृतीचा मार्ग आहे.[8] "भारतीय संस्कृतीचा मार्ग म्हणजे करूणेचा मार्ग याच मार्गाचा अवलंब विनोबांनी केला.

पोचमपल्ली गावातील ही घटना म्हणजे भूमीहींनाकरिता जमीन न्यायाच्या मार्गाने मालकांच्या हातातून वेगळी होऊ शकते. हा सामाजिक व्यवहारामधला अगदी आगळा आणि कदाचित पहिलाच अनुभव पण अगदी नैसर्गिकपणे आलेला, तोच पुढे श्भूदान यज्ञश या नावाने जगभर गाजला.[9] या घटनेचा उल्लेख करतांना विनोबा नेहमी सांगत की,[१] मी जमीन मागितली आणि जमीन मला मिळाली यात मला ईश्वरी संकेत दिसला. त्या दिवशी रात्री मला झोप आली नाही. रात्रीच्या काळोखांमध्ये माझा ईश्वराशी संवाद झाला. माझ्यासमोर एक आवाहन उभे झाले. देव म्हणाला– अहिंसेवर जर तुझी पूर्ण श्रध्दा असेल, तर तुला संधी मिळाली आहे. तू मागत जा. तुला जमीन मिळेल."[10] विनोबा म्हणतात, त्यावेळी माझ्या लक्षात आले की, देवाचे काम अपूर्ण नसते. तो बाळाच्या पोटात भूक देतो, तर आईजवळ दूधही देतो. हवा, पाणी, सुर्यप्रकाश, हे सर्व जसे देवाने निर्माण केले आहे आणि त्यावर जसा सर्वांचा समान अधिकार आहे, त्याचप्रमाणे ही जमीनही देवानेच निर्माण केली आहे. ती आपली सर्वांची माता आहे. आपण भूमीचे मालक होऊ शकत नाही, सेवक होऊ शकतो, पुत्र होऊ शकतो. हा भूदान यज्ञ भारतीय संस्कृतीला अनुसरून आहे. भूमीसमस्या ही जागतिक समस्या आहे. यात सर्वांनी सहभागी व्हावे."

तेलंगणातील पोचमपल्ली सोडण्यापूर्वी विनोबांनी १०० एकर जागेचे वाटप पूर्ण केले. हरिजन बंधूना नुसती जमीन देवून प्रश्न सुटणार नव्हता. म्हणून विनोबांनी थोडे पैसे व अवजारांची मागणी केली. या दोन्ही गोष्टी मिळाल्यास ते सहकारी पध्दतीने शेती करू शकतील, म्हणून विनोबांनी लोकांकडे मदतीची याचना केली. रामचंद्र रेड्डींनी हा प्रश्न सोडविण्याचे तात्काळ मान्य केले. या कामासाठी दोन हरिजन बंधू, स्वत रेड्डी व गावातील दोन अनुभवी कार्यकर्ते अशा पाच जणांची समिती नेमण्यात आली.[11]

तेलंगण सोडण्यापूर्वी विनोबांनी कोंदडराम रेड्डी, लक्ष्मीबाई जंगम आणि केशवराव अशा तिघांची समिती नेमली आणि या समितीचे नाव ठेवले श्शून्य समितीश‌ए या तिघांनी दानात मिळालेल्या जमीनींचे व्यवस्था लावयची होती. विनोबांच्या अनुयायांनी पुढे एक लाख एकर जमीन भूदान यज्ञामध्ये मिळविली. या यात्रेत विनोबांनी लोकांमधील संघर्ष कमी करून, समन्वयावर भर दिला. अंदाजे दोन लाख लोकांसमोर भाषणे केली. सरासरी दोनशे चाळीस एकर जमीन रोज मिळाली.[12]

विनोबांच्या तेलंगणातील भूदानाच्या उपक्रमाची देशभर दखल घेण्यात आली. पंडित नेहरू म्हणाले, "शस्त्रांनी जो परिणाम झाला नव्हता तो विनोबांनी शब्द आणि कृती यातून विलक्षण सामर्थ्याने घडून आणला." राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले की, "हे काही भाकड जमीनीचे दान नव्हे. गांधीजींनी ज्या नव्या समाजाचे चित्र पाहिले होते त्याचाच हा नमुना आहे." तत्वज्ञ उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन म्हणाले की, श्हे आपल्या राष्ट्राच्या श्रध्देचे प्रतीक मानता येईल." न्युयार्क टाईम्सचा खास प्रतिनिधी रॉबर्ट ट्रबल याने विनोबांना, श्प्रेमाने लुटणारा आणि जमीन वाटणारा प्रतिपरमेश्वरश असे म्हटले तर टाईम्स मॅगझीनने त्यांना श्गांधीजींचा समर्थ चेलाश संबोधले.[13]

भूदान चळवळीच्या इतिहासाचे दोन कालखंड दिसून येतात. पहिला कालखंड इ.स. १९५१ ते १९५७ असा असून या कालखंडात भूदान चळवळीचा जोर फार मोठा होता. या कालखंडात अखिल भारतातून ४३,८१,८७१ एकर जमीन दानामध्ये प्राप्त झाली. दुसरा कालखंड १९५८ पासून सुरू झाला. या कालखंडात मात्र चळवळीची प्रगती न होता दानामध्ये घट झाली. घट होण्याचे कारण म्हणजे, मिळालेल्या जमीनींपैकी बऱ्याच जमिनी दात्यांचा जमिनीवर अपूर्ण हक्क असल्या कारणाने किंवा जमिनी कौटुंबिक कलहात असल्याकारणाने शासनाने नामंजूर केल्या. याशिवाय काही जमिनी स्वत दात्यांनीच परत घेतल्या. भूदान आंदोलनास पुढे ग्रामदानांचे स्वरूप प्राप्त झाले. तथापि कालांतराने या दोन्ही चळवळी अस्तगत होत गेल्या.[14]

एकूणच आचार्य विनोबांनी तेलंगणात भूदान चळवळ सुरू करून समाजातील आर्थिक विषमता नष्ट करून समता निर्माण करण्याच्या दृष्टिने उचलेले महत्वाचे पाऊल होते. विनोबांच्या या भूदान यज्ञाने अनेक गरीब भूमीहीनांना जमीन मिळाली ज्यांच्याजवळ जमीन नाही अशांसाठी कोणीतरी जमीन द्यायला तयार होतो हे दृश्य आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच घडले. आचार्य विनोबांचे हे कार्य अद्भूत असे आहे.

### *संदर्भ*


१)गणेश राऊत, आचार्य विनोबा भावे महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला (संच) गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २०१० पृ.१५.
२)कि.का. चौधरी (संपा) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर वर्धा जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, १९९२ पृ. १०५.
३)कित्ता पृ. १०४.
४)किसन चोपडे, महाराष्ट्राचे शिल्पकार विनोबा भावे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०१०, पृ. ५१,५२.
५)गणेश राऊत, उपरोक्त पृ. १३५.
६)किसन चोपडे, उपरोक्त पृ. ५३.
७)गणेश राऊत, उपरोक्त पृ. १३६.
८)कित्ता पृ. १४०.
९)बाबुलाल गांधी, भारतातील भूमीहीन आणि भूदान, पप्रप, पआ, १९५३, पृ. ६८.
१०)निर्मला देशपांडे, विनोबा नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, पृ. १९९८ पृ. २३.
११)गणेश राऊत, उपरोक्त पृ. १३७.
१२)कित्ता पृ. १३८.
१३)सविता भावे, दानयोगी विनोबा, वरदा प्रकाशन, पुणे १९९५ पृ.१६७.
१४)कृ. र. नानेकर आणि श्री. वि. खांदेवाले, विदर्भातील भूदान, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर, १९७० पृ. २,६.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net